आजचे पंचांग

शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, अष्टमी रात्री ११-१६ पर्यंत नंतर नवमी तिथी, दिवस नक्षत्र– पूर्वाषाढा सकाळी ११-२८ पर्यंत नंतर उत्तराषाढा चंद्र रास- धनु सायंकाळी ६-०४ पर्यंत नंतर मकर, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. १० एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - १९५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### लाडक्या बहिणींना मुदतवाढ

**मुंबई:** राज्यातील लाखो लाभार्थी महिलांसाठी महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासनाने पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. आता ही मुदत ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. ई-केवायसीची प्रक्रिया ३० सप्टेंबर २०२५ पासून सुरू झाली होती. सुरुवातीला नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. ती ३१ डिसेंबर २०२५, नंतर ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आली होती.

## सारांश वृत्त

### महिला आरक्षण विधेयक हा देखावा

**चेन्नई :** डीएमके नेत्या कनिमोझी सोमू यांनी महिला आरक्षण विधेयकाला 'राजकीय खेळी' म्हटले असून, रात्री उशिरा होणारी सत्रे 'केवळ एक देखावा' असल्याचे म्हटले आहे. जोपर्यंत द्रविड विचारधारा राज्याचा पाया राहील, तोपर्यंत भाजप तामिळनाडूमध्ये कधीही सत्ता मिळवू शकणार नाही, असे त्या म्हणाल्या. "रात्री उशिरा चालणारी ही सत्रे केवळ जगाचे लक्ष वेधून घेण्यासाठी आयोजित केली जात होती," असे सोमूने सांगितले.

### पाच पोलिसांवर गुन्हा दाखल

**चंदीगड :** अमेरिकेच्या फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनला (एफबीआय) हवा असलेल्या एका आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्कराचा जप्त केलेला पासपोर्ट सोडवण्यासाठी मदत केल्याच्या आरोपावरून पंजाबच्या तरनतारन भागातील पाच पोलीस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. बटाला येथील शेहनाज सिंग उर्फ शॉन भिंदरला, राज्य सरकारच्या 'युद्ध नाशिया विरुद्ध' या अमली पदार्थ विरोधी मोहिमेदरम्यान गेल्या मार्चमध्ये अटक करण्यात आली होती.

### बनावट कॉल सेंटरचा पर्दाफाश

**नवी दिल्ली :** उत्तर फरिदाबाद फरिदाबाद पोलिसांनी गुरुवारी सांगितले की, त्यांनी एका बनावट कॉल सेंटरचा पर्दाफाश केला असून विमा पॉलिसीवर बोनस देण्याचे आमिष दाखवून लोकांची फसवणूक केल्याप्रकरणी सहा जणांना अटक केली आहे. दिल्लीतील टिळक नगर येथील एका भाड्याच्या जागेतून कॉल सेंटर चालवले जात होते.

### बेरूतवरील इस्रायली हल्ल्यांनी तणाव वाढला

# युद्धविराम कराराचे भवितव्य अधांतरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** इराण-इस्रायल-अमेरिका संघर्षात जाहीर करण्यात आलेला तात्पुरता शस्त्रसंधी करार गुरुवारी डळमळीत झाल्याचे चित्र दिसून आले. बेरूतवरील इस्रायलच्या तीव्र हवाई हल्ल्यांमुळे तणाव पुन्हा वाढला असून, होर्मुझची सामुद्रधुनीवरील इराणची पकड आणि करारातील मतभेद यामुळे परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची बनली आहे.

इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यातील लढाई शस्त्रसंधीत समाविष्ट आहे की नाही, यावरच मतभेद असताना, करार जाहीर झाल्यानंतर काही तासांतच इस्रायलने बेरूतवर हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये किमान २०३ जणांचा मृत्यू, तर १,००० हून अधिक जखमी झाल्याची माहिती लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने दिली आहे. २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या संघर्षातील हा सर्वाधिक प्राणघातक दिवस ठरला. इस्रायलने गुरुवारी अली युसूफ हर्शी यांचा खात्मा केल्याचा दावा केला. ते हिजबुल्लाहचे प्रमुख नईम कासेम यांचे सहकारी होते. "इस्रायलवर हल्ला करणाऱ्यांना ठोस प्रत्युत्तर दिले जाईल," असे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी स्पष्ट केले.

इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी लेबनॉनमधील युद्धबंदी हा कराराचा भाग असल्याचा दावा केला. मात्र, इस्रायल आणि अमेरिका याने तो फेटाळून लावला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इशारा दिला की, "इराणने कराराचे पालन केले नाही, तर अमेरिका पूर्वीपेक्षा अधिक कठोर कारवाई करेल."

इराणच्या निम-सरकारी वृत्तसंस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, देशाच्या 'रिव्होल्यूशनरी गार्ड'ने होर्मुझ सामुद्रधुनीत सागरी सुरुंग पेरल्याचे संकेत दिले आहेत. जगातील सुमारे २०% तेल आणि नैसर्गिक वायू वाहतूक या मार्गावरून होते. त्यामुळे या सामुद्रधुनीवरील तणावामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून या मार्गाने अत्यल्प जहाजे प्रवास करत आहेत. केप्लरच्या आकडेवारीनुसार, अलीकडे फक्त ४ जहाजांनीच हा मार्ग वापरला आहे.

या परिस्थितीचा थेट परिणाम जागतिक बाजारावर झाला आहे. ब्रेंट क्रूडचा दर सुमारे ९८ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचला असून, युद्ध सुरू झाल्यापासून त्यात जवळपास ३५% वाढ झाली आहे. त्यामुळे इंधनासह अन्नधान्य आणि इतर आवश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यातील पुढील चर्चेसाठी पाकिस्तानमध्ये बैठक होणार असून, अमेरिकेच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व उपराष्ट्रपती जेडी व्हान्स करणार आहेत. या चर्चेत सामुद्रधुनीवरील नियंत्रण, जहाज वाहतूक, अणुकार्यक्रम आणि युद्धबंदीच्या अटी यावर तोडगा निघतो का, याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

# गुलाबी जॅकेटमध्ये पार्थ पवारांची राज्यसभेत एंट्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेसचे तरुण नेते पार्थ पवार यांनी गुरुवारी राज्यसभेच्या खासदारपदाची शपथ घेत औपचारिकरित्या संसदेच्या उच्च सभागृहात प्रवेश केला. संसद भवनात झालेल्या या सोहळ्यात राज्यसभेचे सभापती आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. शपथविधी प्रसंगी त्यांच्यासोबत आई आणि महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, तसेच पक्षाचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

पार्थ पवार यांनी यावेळी गुलाबी जॅकेट आणि डोळ्यावर चष्मा असा लूक ठेवला होता. हा लूक दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्टाईलशी साधर्म्य साधणारा असल्याने राजकीय वर्तुळात त्याची जोरदार चर्चा रंगली. अजित पवार यांनी राजकारणात गुलाबी जॅकेट ही स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती.

पार्थ पवार हे महाराष्ट्रातून राज्यसभेत प्रवेश करणारे युवा नेते असून, एप्रिल २०२६ पासून ते खासदार म्हणून कार्यरत आहेत. त्यांची नियुक्ती ही पवार कुटुंबाच्या राजकीय वारशातील पुढील पायरी मानली जात आहे. शपथविधीनंतर उपराष्ट्रपतींनी पार्थ पवार यांचे अभिनंदन करत "वडिलांचा वारसा समर्थपणे पुढे चालवा" असा सल्लाही दिला. या शपथविधीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या पिढीची औपचारिक एंट्री झाल्याचे मानले जात आहे. पवार कुटुंबातील तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करत पार्थ पवार आता राष्ट्रीय राजकारणात सक्रिय भूमिका बजावतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# 'ग्रीन आशा' एलपीजी जहाज मुंबईत दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** इराण-इस्रायल-अमेरिका तणावामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी दिलासादायक घडामोड घडली आहे. भारतीय ध्वजाचे ग्रीन आशा हे तेलवाहू जहाज गुरुवारी (९ एप्रिल) १५,४०० टन एलपीजी घेऊन मुंबईत दाखल झाले.

या जहाजाने अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या होर्मुझची सामुद्रधुनी यशस्वीपणे पार करत नवी मुंबईतील जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएनपीए) येथे प्रवेश केला. बीपीसीएल-आयओसीएलद्वारे संचालित लिक्विड बर्थवर जहाजाने नांगर टाकला. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझची सामुद्रधुनी धोकादायक बनली होती. मात्र, अलीकडेच दोन आठवड्यांची शस्त्रसंधी जाहीर झाल्यानंतर आणि इराणने सामुद्रधुनी खुली केल्यानंतर हे जहाज भारतात पोहोचले आहे. युद्धस्थिती सुरू झाल्यानंतर होर्मुझ पार करून जेएनपीएमध्ये पोहोचणारे हे पहिलेच एलपीजी जहाज ठरले आहे, त्यामुळे त्याचे महत्त्व अधिक वाढले आहे. जहाज, त्यावरील माल आणि सर्व कर्मचारी पूर्णपणे सुरक्षित आहेत. "गुंतागुंतीच्या भू-राजकीय परिस्थितीतही सागरी वाहतुकीची कार्यक्षमता कायम असल्याचे हे उदाहरण आहे. या आगमनामुळे देशातील एलपीजीचा पुरवठा अखंड राखण्यास मदत होईल," असे प्राधिकरणाने स्पष्ट केले.

### बारामती मतदारसंघातून काँग्रेसची माघार

# सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड नाहीच

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बारामती :** राज्याचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसने अखेर माघार घेतली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासमोर काँग्रेसने आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. परंतु आज आकाश मोरे यांची उमेदवारी मागे घेण्यात आली आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेत असल्याचं जाहीर केले. पोटनिवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. आज अखेर ॲड. आकाश मोरे यांनी निवडणुकीत माघार घेतली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबतची घोषणा केली होती. काँग्रेसच्या माघारीनंतर सुनेत्रा पवार यांच्यासमोरील आव्हान संपेल असे वाटत होते. पण तसे अजिबात झालेले नाही आहे. कारण अद्याप २३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात ठाम आहेत.त्यामुळे बारामतीत मतदान होणार आहे.

अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी दिल्ली पातळीवरील शिष्टाईनंतर काँग्रेसने ऐनवेळी माघार घेतली. त्यामुळे निवडणुकीतील संभाव्य चुरस टळली आणि सुनेत्रा पवार यांच्या निवडीची प्रक्रिया एकतर्फी होण्याची शक्यता निर्माण झाली.

या घडामोडीनंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत भूमिका स्पष्ट केली. "आम्ही अर्ज मागे घेतला असला, तरी ही केवळ परिस्थितीजन्य भूमिका आहे. २०२९ मध्ये बारामतीत काँग्रेसचाच आमदार असेल," असा ठाम दावा त्यांनी केला. तसेच, बारामतीत जसा राजकीय आग्रह धरण्यात आला, तसाच आग्रह इतर मतदारसंघांमध्येही ठेवला गेला पाहिजे, असे सांगत त्यांनी शिष्टाईच्या समानतेचा मुद्दा उपस्थित केला.

सपकाळ यांनी भूतकाळातील उदाहरण देत, दिवंगत आमदार चंद्रकांत जाधव यांच्या निधनानंतर झालेल्या निवडणुकीत भाजपने उमेदवार देऊन चुरस निर्माण केली होती, याची अप्रत्यक्ष आठवण करून दिली. "ही माघार आम्ही वैचारिक भूमिका आणि राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन घेतली आहे," असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, ही माघार अजित पवार यांच्यासाठी असल्याचा टोला त्यांनी लगावला.

दरम्यान, उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनीही आपली भूमिका मांडली. "पक्षाने थांबायला सांगितल्यामुळे मी हा निर्णय घेतला," असे ते म्हणाले.

### स्थायी समिती अध्यक्षांचा गंभीर आरोप

# महापालिकेत ५२ कोटींचा बिल घोटाळा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकामध्ये तब्बल ५२ कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या बिलांबाबत गंभीर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप समोर आला आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी बुधवारी (दि. ८) हा धक्कादायक आरोप करत, हा प्रकार केवळ तांत्रिक त्रुटी नसून अधिकारी आणि ठेकेदारांच्या संगनमताने महापालिकेच्या तिजोरीवर टाकलेला दरोडा असल्याचा दावा केला.

बारणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बोगस उपसूचनांच्या आधारे ३० मार्च रोजी परस्पर संबंधित ठेकेदारांना ही बिले अदा करण्यात आली. विशेष म्हणजे, सन २०२६-२७ चा अधिकृत अर्थसंकल्प मंजूर असताना संबंधित कामांसाठी कोणतीही आर्थिक तरतूद नसतानाही सुमारे ७० हून अधिक कामांची बिले रात्रीतून काढण्यात आल्याचा आरोप आहे. या बिलांमध्ये पाणीपुरवठा, स्थापत्य, बीआरटी विभागांसह नाशिक फाटा, मोशी, तळवडे आणि भोसरी परिसरातील रस्ते कामांचा समावेश असल्याचे सांगितले जाते.

या प्रकरणी संबंधित विभागप्रमुखांनाही कोणतीही पूर्वकल्पना देण्यात आली नसल्याचे समोर आले आहे. तसेच, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) प्रवीण जैन यांनी नगरसेवकांची दिशाभूल केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. दोन नगरसेवकांच्या सह्या घेतल्याशिवाय बिल मंजूर होणार नाही, अशी अट घालून विविध पक्षांतील जवळपास २० नगरसेवकांच्या सह्या घेण्यात आल्याचेही बारणे यांनी सांगितले. याहून गंभीर बाब म्हणजे, ज्या सर्वसाधारण सभेच्या उपसूचनांच्या आधारावर ही कोट्यवधींची बिले अदा करण्यात आली, त्या उपसूचनांवर साधी तारीखदेखील नसल्याचे उघड झाले आहे. नगर सचिव विभागाने या उपसूचना अधिकृत नसल्याचे स्पष्ट केल्यामुळे संपूर्ण प्रकरण अधिकच संशयास्पद बनले आहे. या पार्श्वभूमीवर बारणे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे तक्रार दाखल करत, संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### सायबर फसवणुकी प्रकरणी दोघांना अटक

**नवी दिल्ली :** सोशल मीडिया ॲपद्वारे चालवल्या जाणाऱ्या एका बनावट शेअर गुंतवणूक योजनेच्या माध्यमातून जास्त परताव्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची सुमारे ७ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली. शशिकांत शर्मा आणि दीपक अशी ओळख पटलेल्या आरोपींना दिल्लीतील पालम परिसरातून अटक करण्यात आली. जास्त परतावा देण्याचे आमिष दाखवून ७ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करणाऱ्या एका व्यक्तीच्या तक्रारीवरून शाहदरा येथील सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाहतूक नियमांबाबत नागरिकांनी भान ठेवावे

### उच्च न्यायालयाची टिप्पणी, अपघातग्रस्तांना वाढीव नुकसानभरपाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांनी विकसित देशांकडून बोध घेण्याची वेळ आता आली आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान नोंदवले. याच वेळी, रस्ता ओलांडताना बसच्या धडकेत मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला न्यायालयाने वाढीव नुकसानभरपाईही मंजूर केली.

न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले की, नागरी कर्तव्यांच्या पालनासाठी कायद्याने सक्ती नसली तरी नागरिकांनी स्वतःहून वाहतूक नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. "भारतीय नागरिक परदेशात असताना नियम काटेकोरपणे पाळतात, मात्र देशात परतल्यावर त्याकडे दुर्लक्ष करतात, हे अनाकलनीय आहे," असे न्यायालयाने नमूद केले.

घरातील वडीलधारी मंडळी आणि पालक स्वतः वाहन चालवताना किंवा रस्ता ओलांडताना नियमांचे उल्लंघन करतात, याकडे न्यायालयाने विशेष लक्ष वेधले. "यामुळे मुलांसमोर चुकीचा आदर्श निर्माण होतो आणि मुलेही त्याचे अनुकरण करतात," असे नमूद करत, पालकांनी नियमांचे पालन करणे हे नैतिक कर्तव्य असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले. "मुले जे पाहतात तेच आत्मसात करतात," या निरीक्षणासह, योग्य नागरी भान निर्माण करण्यासाठी कुटुंबातील वर्तन महत्त्वाचे असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.


न्यायालयाने पादचाऱ्यांनाही नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. अनेकदा सिग्नल आणि वाहतूक चिन्हांकडे दुर्लक्ष करून रस्ता ओलांडल्यामुळे अपघात होतात, असे नमूद करत "जबाबदार नागरिक म्हणून नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे," असे स्पष्ट करण्यात आले.

### कल्पक्कममध्ये फास्ट ब्रीडर रिॲक्टर यशस्वी; रशियानंतर भारत ठरला दुसरा देश

# अणूऊर्जेत भारताची स्वावलंबनाकडे भरारी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई/कल्पक्कम :** भारताच्या अणूऊर्जा कार्यक्रमात आज एका सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा इतिहास रचला गेला आहे. तमिळनाडूतील कल्पक्कम येथील प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टरने (पीएफबीआर) क्रिटिकॅलिटी (स्वयंचलित अणूविखंडन प्रक्रिया) साध्य केली आहे. या यशासह, व्यावसायिक स्तरावर हे अत्यंत प्रगत तंत्रज्ञान यशस्वी करणारा रशियानंतर भारत हा जगातील केवळ दुसरा देश ठरला आहे. सामान्य अणूभट्ट्यांमध्ये जेवढे इंधन वापरले जाते, त्यातून ऊर्जा मिळते. मात्र, फास्ट ब्रीडर रिॲक्टरचे वैशिष्ट्य असे की, हे



रिॲक्टर जेवढे इंधन वापरतात, त्यापेक्षा जास्त इंधन स्वतःच तयार करतात. ५०० मेगावॅट क्षमतेचा हा रिॲक्टर संपूर्णपणे भारतीय बनावटीचा असून, तो भारताच्या थ्री-स्टेज अणूऊर्जा कार्यक्रमातील दुसरा आणि अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. विशेष म्हणजे, अमेरिका, जपान आणि फ्रान्स यांसारख्या बलाढ्य देशांनी या तंत्रज्ञानावर अब्जावधी डॉलर्स खर्च केले होते. मात्र, तांत्रिक गुंतागुंत आणि द्रव सोडिअम हाताळण्यातील आव्हानांमुळे त्यांना हे प्रकल्प पूर्णत्वास नेता आले नाहीत. भारतीय शास्त्रज्ञांनी मात्र गेल्या दोन दशकांच्या मेहनतीतून हे शिवधनुष्य यशस्वीपणे पेलले आहे.

भारतासाठी हे यश का महत्त्वाचे?
तर युरेनियमची चिंता मिटणार: भारताकडे नैसर्गिक युरेनियमचे साठे मर्यादित आहेत. हा रिॲक्टर युरेनियमचा वापर करून प्लुटोनियम तयार करेल, ज्याचा वापर इंधन म्हणून पुन्हा करता येईल. थोरियमचा मार्ग मोकळा: भारताकडे जगातील सर्वाधिक थोरियमचे साठे आहेत. या रिॲक्टरच्या यशानंतर भविष्यात थोरियमपासून वीजनिर्मिती करणे भारताला शक्य होणार आहे. ऊर्जा स्वातंत्र्य: या तंत्रज्ञानामुळे भारताचे परकीय इंधनावरील अवलंबित्व कमी होईल आणि देश ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी होईल. या तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे यातून निर्माण होणारा किरणोत्सर्गी कचरा अत्यंत कमी असतो. तसेच, इंधन पुनर्वापरामुळे भविष्यात अतिशय स्वस्त दरात वीज उपलब्ध होऊ शकते.

हे यश भारताच्या अणूऊर्जा प्रवासातील एक ऐतिहासिक मैलाचा दगड आहे. आपल्या शास्त्रज्ञांनी जागतिक स्तरावर भारताची मान उंचावली असून, देश आता अणूऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भरतेकडे वेगाने वाटचाल करत आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाचे कौतुक केले आहे. कल्पक्कममधील या यशस्वी प्रयोगानंतर आता भारत आपल्या अणूऊर्जा कार्यक्रमाच्या तिसऱ्या टप्प्याकडे कूच करत असून, यामुळे आगामी दशकात भारताचे ऊर्जेचे चित्र पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे.

# तीन राज्यांत उत्साहात मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आसाम, केरळ आणि पुदुच्चेरी येथे गुरुवारी झालेल्या विधानसभा निवडणुकांत मतदारांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, पुदुच्चेरी येथे सर्वाधिक ८९.०८ टक्के, आसाम मध्ये ८५.०४ टक्के, तर केरळ मध्ये ७७.३८ टक्के मतदानाची नोंद झाली.

आसाममध्ये सर्व १२६ विधानसभा मतदारसंघांमध्ये एकाच टप्प्यात मतदान पार पडले. सायंकाळी ६ वाजेपर्यंत ८५.०४ टक्के मतदान झाले, जे २०२१ मधील ८२.०४ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. राज्यात सत्ताधारी भाजप-आघाडी सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी प्रयत्न करत असून, काँग्रेस पुनरागमनासाठी जोर लावत आहे. केरळमध्ये सर्व १४० जागांसाठी मतदान झाले. सायंकाळी ६ वाजेपर्यंत ७७.३८ टक्के मतदान नोंदवले गेले, जे २०२१ मधील ७४.०६ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. मतदानाची वेळ संपल्यानंतरही केंद्रांवर उपस्थित असलेल्या मतदारांना टोकन देऊन मतदानाची संधी देण्यात आली. त्यामुळे अंतिम मतदानाची टक्केवारी आणखी वाढण्याची शक्यता आहे. पुदुच्चेरीतील ३० मतदारसंघांमध्ये मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असून, येथे ८९ टक्क्यांहून अधिक मतदान झाले आहे. येथे सत्ताधारी एनडीए पुन्हा सत्ता टिकवण्याचा प्रयत्न करत आहे. स्थानिक स्वायत्तता आणि प्रशासनातील मतभेद हे प्रमुख मुद्दे ठरले.

तीनही राज्यांमध्ये मागील निवडणुकांच्या तुलनेत मतदानात वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. मतदारांमध्ये राजकीय प्रक्रियेबद्दल वाढता सहभाग आणि जागरूकता दिसून येत आहे.

## संपादकीय

### राजकारणाचा संक्षेप



**भारतीय राजकारणाची शब्दसंपदा समृद्ध असल्याचा समज आहे. पण अलीकडील घडामोडी वेगळेच चित्र दाखवतात. तत्त्व, विचार आणि बांधिलकी यांना मागे टाकत स्वार्थ केंद्रस्थानी येऊ लागला आहे. शब्द मोठे आहेत; पण त्यांच्या शेवटी उरतो तो एकच अर्थ आणि तो म्हणजे स्वार्थ.**

राजकारण तत्त्वांवर उभे असते, हा एकेकाळचा समज. आज तो समज उरला आहे; वास्तव बदलले आहे. आता राजकारण विचारांचे कमी आणि सोयीचे अधिक झाले आहे. आणि सोयीचा हा मार्ग बहुतेक वेळा थेट स्वार्थाकडेच जातो. शब्द बदलतात; शेवट तोच. स्वार्थ. भारतीय लोकशाहीचा पाया त्याग, मूल्ये आणि सार्वजनिक हित या संकल्पनांवर उभा राहिला. पण त्या पायावर उभे राहून पुढे जे बांधले गेले, ते हळूहळू वेगळ्याच दिशेने वळले. सत्तेचा मार्ग तत्त्वांमधून नव्हे, तर समीकरणांतून जाऊ लागला. समीकरणे बदलली, की भूमिका बदलणेही सहज झाले. इतके सहज, की त्यात विसंगतीही जाणवत नाही. आज 'एस' ने सुरू होणारे शब्द राजकारणात सहज ऐकू येतात. सेक्युलर, सोशल जस्टिस, सिक्युरिटी, स्टॅबिलिटी. शब्द आकर्षक. अर्थही मोठे. पण या सगळ्यांचा शेवट 'सेल्फ-इंटरेस्ट'मध्येच होत असेल, तर या शब्दांच्या मोठेपणाला किती किंमत उरते? प्रश्न भाषेचा नाही; तो हेतूचा आहे. राजकीय पक्षांच्या भूमिकांकडे पाहिले, तर हे अधिक स्पष्ट होते. विरोधात असताना जे चुकीचे वाटते, ते सत्तेत आल्यावर योग्य ठरते. कालचा विरोधक आजचा सहयोगी होतो. आजचा मुद्दा उद्या गौण ठरतो. हा विचारांचा विकास नाही; ही राजकीय सोय आहे. आणि सोय जेव्हा धोरण ठरते, तेव्हा तत्त्वे मागे पडतात. हीच स्थिती व्यक्तींच्या पातळीवरही दिसते. पक्षांतर, भूमिका बदल, विधानांतील विरोधाभास हे आता अपवाद राहिलेले नाहीत. ते नवे सामान्य झाले आहे. इतके सामान्य, की त्यात प्रश्नच उरत नाही. जेव्हा विसंगतीच नियम बनते, तेव्हा विश्वास ढासळतो. लोकशाहीचा गाभा विश्वासात असतो. मतदारांना वाटले पाहिजे की त्यांचे प्रतिनिधी काही तत्त्वांवर उभे आहेत. पण जेव्हा प्रत्येक निर्णयामागे स्वार्थ दिसू लागतो, तेव्हा हा विश्वास कमी होतो. लोकशाही उरते पण केवळ नावापुरती. या प्रवृत्तीमागे काही ठोस कारणेही आहेत. निवडणुका अधिक खर्चिक झाल्या, सत्तेचे केंद्रीकरण वाढले, आणि प्रतिमानिर्मितीला प्राधान्य मिळाले. परिणामी, राजकारण अधिक व्यवहारकेंद्री झाले. तत्त्वे टिकवणे अवघड झाले. पण अवघड आहे म्हणून अशक्य नाही. मतदारांची भूमिका इथे निर्णायक ठरते. इतिहासाने अनेकदा दाखवून दिले आहे की मतदार असंतोष व्यक्त करतो, तेव्हा समीकरणे बदलतात. पण मतदारांनी केवळ व्यक्तींवर नव्हे, तर त्यांच्या भूमिकांवर प्रश्न विचारले पाहिजेत. अन्यथा बदल हा केवळ चेहऱ्यांचा राहतो; प्रवृत्ती तशीच राहते. राजकीय पक्षांसाठीही हा इशारा आहे. अल्पकालीन फायद्यासाठी घेतलेले निर्णय दीर्घकालीन नुकसान करतात. स्वार्थावर उभे राहिलेले राजकारण सतत नव्या समीकरणांच्या आधारावर टिकते. ते स्थैर्य देत नाही; ते केवळ तात्पुरती सोय निर्माण करते. याचा परिणाम सार्वजनिक चर्चेवरही होतो. मुद्दे गौण ठरतात, व्यक्ती केंद्रस्थानी येतात. धोरणांवर चर्चा कमी होते, प्रतिमांवर अधिक. आणि जेव्हा चर्चा दिशाहीन होते, तेव्हा लोकशाहीचा अर्थही संकुचित होतो. राजकारणाची ही सध्याची प्रवृत्ती फक्त व्यक्तीपरत्वे नाही; ती व्यवस्थेपर्यंत पसरलेली आहे. धोरणे आणि निर्णय हे दीर्घकालीन परिणामांपेक्षा तात्पुरत्या फायद्यांवर आधारले जातात. सार्वजनिक हित कमी महत्त्वाचे ठरते, तर व्यक्तिगत किंवा पक्षीय स्वार्थावर भर दिला जातो. परिणामतः विश्वासाची घसरण होते, लोकशाहीतील पारदर्शकता धूसर होते आणि नागरिकांना वाटते की ते केवळ निरीक्षक आहेत, सहभागी नाहीत. ही स्थिती बदलली नाही, तर ती प्रबळ झाली आहे. यात माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. प्रश्न विचारण्याऐवजी प्रतिमा उभी करण्यावर भर दिला गेला, की सत्तेला सोयीचे वातावरण तयार होते. टीकेचा अभाव हा स्वार्थाला खतपाणी घालतो. आणि जेव्हा प्रश्नच विचारले जात नाहीत, तेव्हा उत्तरांची गरज उरत नाही. राजकारणाची खरी कसोटी सत्तेत नसते; ती सत्तेच्या वापरात असते. स्वार्थासाठी सत्ता वापरणे सोपे. सार्वजनिक हितासाठी वापरणे कठीण. पण त्या कठीणतेतच लोकशाहीचा अर्थ दडलेला असतो. 'एस' ने सुरू होणारे शब्द आकर्षक असतात. पण त्यांचा शेवट जर कायम 'स्वार्थ'मध्येच होत असेल, तर त्या आकर्षणाचा उपयोग काय? शब्द मोठे असले, तरी हेतू लहान असेल, तर राजकारणही लहानच राहते. आणि राजकारण लहान झाले, तर लोकशाहीही अर्थातच मोठी राहात नाही.

# संपत्तीचे शिखर आणि विषमतेची मोठी किंमत

**» जगातील संपत्ती वाढते आहे, असे सांगितले जाते. पण त्या वाढीची किंमत कोण मोजतो, हा प्रश्न विचारला जात नाही. मोजक्यांच्या हाती संपत्ती साठत असताना बहुसंख्यांना असुरक्षिततेत जगावे लागते.**



जागतिक अर्थव्यवस्था वाढते आहे. आकडे त्याची साक्ष देतात. उत्पादन वाढते, बाजार विस्तारतात, तंत्रज्ञान नवे मार्ग उघडते. पण या सगळ्या वाढीचा अर्थ एकसमान नाही. वरच्या थरात संपत्ती साचते; खालच्या थरात असुरक्षितता वाढते. वाढ सर्वांची असते, असा दावा केला जातो; पण लाभ मात्र मोजक्यांचाच होतो.

विषमता नवी नाही; पण तिचा वेग आणि व्याप नक्कीच नवा आहे. जागतिकीकरणाने संधी निर्माण केल्या, पण त्या सर्वांसाठी उघड्या राहिल्या नाहीत. भांडवल आणि कौशल्य असलेल्यांनी झेप घेतली; बाकीचे मागेच राहिले. ही केवळ दरी नाही; हा एक संरचनात्मक तफावत आहे.

तंत्रज्ञानाने या प्रक्रियेला गती दिली. डिजिटल अर्थव्यवस्थेत काही कंपन्यांनी अभूतपूर्व वर्चस्व मिळवले. डेटा, नेटवर्क आणि भांडवल यांच्या जोरावर त्यांनी बाजारावर पकड मजबूत केली. परिणामी, संपत्ती निर्माण होण्याचा वेग वाढला; पण तिचे वितरण अधिकच असमतोल झाले. वरचा थर उंचावत गेला, तशी खालची पातळी अधिकच अस्थिर झाली.

करप्रणालीनेही या असमतोलाला हातभार लावला. नियम सर्वांसाठी असल्याचे सांगितले जाते; पण त्यातील पळवाटा मोजक्यांनाच सापडतात. मोठ्या कंपन्या कर टाळण्याचे मार्ग शोधतात, तर सामान्य नागरिकांवर करभार वाढतो. ही व्यवस्था कायदेशीर असली, तरी न्याय्य आहे का, हा प्रश्न उरतोच.

या विषमतेची किंमत केवळ आर्थिक नाही. ती सामाजिक असंतोषाच्या रूपाने समोर येते. जेव्हा मोठा वर्ग स्वतःला व्यवस्थेबाहेर समजू लागतो, तेव्हा त्याचा परिणाम राजकारणावर होतो. ध्रुवीकरण वाढते, तर्क मागे पडतो आणि भावनिक राजकारणाला खतपाणी मिळते. यातून पुढे येणारा धोका अधिक गंभीर आहे. संपत्ती आणि सत्ता यांचे नाते अधिक घट्ट होते. धोरणे सर्वांसाठी असल्याचे सांगितले जाते; फायदा मात्र मोजक्यांचाच होतो. विषमता ही अपवाद राहत नाही; ती व्यवस्थेचा भाग बनते.

या परिस्थितीत एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. विकासाचा अर्थ नेमका काय? केवळ संपत्ती निर्माण होणे पुरेसे आहे का? की त्या संपत्तीचा लाभ व्यापक समाजापर्यंत पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे? वाढ सर्वांना स्पर्श करत नसेल, तर ती अपुरीच ठरते.

उपाय माहित आहेत. प्रगत करप्रणाली, सामाजिक सुरक्षेचे जाळे, शिक्षण आणि आरोग्यातील गुंतवणूक हे सगळे मार्ग स्पष्ट आहेत. पण अडचण उपायांत नाही; अडचण इच्छाशक्तीत आहे. कारण विषमता कमी करणे म्हणजे सत्तेचे आणि संपत्तीचे पुनर्वितरण करणे. आणि ते सहज घडत नाही.

याशिवाय, जागतिक पातळीवर भांडवलाच्या मुक्त हालचालीमुळे राष्ट्रीय धोरणांवर मर्यादा येतात. एखाद्या देशाने कर वाढवला, तर भांडवल दुसरीकडे सरकते. त्यामुळे सरकारे सावध राहतात. परिणामी, विषमता कमी करण्याची गरज मान्य असली, तरी कृती मर्यादित राहते.

संपत्तीच्या विषम वितरणामुळे समाजात अविश्वास आणि असंतोषाची लागरच निर्माण होते. आर्थिक शिखरावर बसलेले काही गट धोरणांवर आणि राजकारणावर दबाव टाकतात, तर मोठा बहुसंख्य वर्ग रोजगाराच्या अनिश्चिततेत आणि जीवनावश्यक सेवा मिळवण्याच्या संघर्षात अडकतो. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षेतील अंतर अधिकच खोल होत आहे. ही दरी फक्त आर्थिक नाही; ती सामाजिक ताण, राजकीय ध्रुवीकरण आणि मानसिक असुरक्षिततेला चालना देते. विकास जर काहींच्या हातातच केंद्रित राहिला, तर लोकशाहीचा विश्वास डळमळीत होतो आणि दीर्घकालीन स्थैर्य धोक्यात येते.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे एक विचित्र द्वंद्व. विकास हवा, पण त्याची किंमत कोण मोजणार? संपत्ती निर्माण करायची, पण ती कुणाच्या हातात साठणार? या प्रश्नांची उत्तरे टाळली जातात. आणि जे प्रश्न टाळले जातात, तेच पुढे संकट बनतात. हा प्रश्न आकड्यांचा नाही; तो न्यायाचा आहे.

समाजातील प्रत्येक घटकाला संधी मिळाली पाहिजे, हीच लोकशाहीची अपेक्षा आहे. काहींची समृद्धी जर बहुसंख्यांच्या असुरक्षिततेच्या किंमतीवर उभी असेल, तर तो विकास नाही; तो केवळ असमतोल आहे. संपत्तीचे शिखर जितके उंचावते, तितकी त्याची सावलीही लांब पसरते आणि त्या सावलीतच बहुसंख्य जगत असतील, तर त्या उजेडाचा अर्थ नव्याने विचारावा लागेल.

# शहरातील रस्ते दुरुस्तीनंतरच मेट्रोला निधी

### स्थायी समितीचा ठाम निर्णय; स्थायी समिती बैठकीत निर्णय

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समितीने निगडी ते पिंपरी मेट्रो मार्गावरील सेवा रस्त्यांच्या दुरवस्थेवरून महामेट्रो प्रशासनाला कडक संदेश दिला आहे. सेवा रस्त्यांची तातडीने दुरुस्ती न झाल्यास मेट्रो प्रकल्पासाठी महापालिकेकडून निधी मंजूर केला जाणार नाही, असा स्पष्ट निर्णय बुधवारी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते.

निगडी ते पिंपरी या विस्तारित मेट्रो मार्गाचे काम सध्या सुरू असून आतापर्यंत सुमारे ५५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पासाठी एकूण ९६० कोटी १८ लाख रुपये खर्च अपेक्षित असून त्यापैकी १४६ कोटी ९१ लाख रुपये महापालिकेकडून देण्यात येणार आहेत. यातील ४९ कोटी रुपये आधीच देण्यात आले आहेत, तर आणखी ५० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर होता. मात्र, निगडी ते चिंचवडदरम्यान सेवा रस्त्यांची झालेली दुरवस्था लक्षात घेता, रस्ते दुरुस्त केल्याशिवाय पुढील निधीला मंजुरी देऊ नये, असा निर्णय घेत हा विषय तहकूब करण्यात आला.

दरम्यान, बैठकीत शहरातील विविध विकासकामांनाही मंजुरी देण्यात आली. रावेत येथील इंद्रप्रभा सोसायटी परिसरात रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे महापारेषण कंपनीचे १३२ केव्ही क्षमतेचे दोन वीज मनोरे हटविण्यास सुमारे २१.५५ लाख रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला. तसेच निगडी सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रातील केमिकल टाक्यांना सुरक्षा आवरण उभारणे, मोशी-बोऱ्हाडेवाडी परिसरातील नाले आणि पावसाळी चेंबर्सची साफसफाई, तसेच रावेत, किवळे, मामुर्डी, विकासनगर, साईनगर आणि कोतवालनगर येथे रस्ते दुरुस्तीची कामे हाती घेण्यास हिरवा कंदील देण्यात आला. महापालिकेच्या विविध रुग्णालयांतील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्याचाही निर्णय घेण्यात आला. नवीन थेरगाव, जिजामाता, भोसरी, तालेरा आणि आकुर्डी रुग्णालयांमध्ये सेवा सुरू ठेवण्यासाठी ही मुदतवाढ महत्त्वाची ठरणार आहे. याशिवाय, चिखली येथील जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ सीबीएसई शाळेसाठी २०२५-२६ या वर्षासाठी मंजूर असलेली १ कोटी रुपयांची तरतूद धनादेशाद्वारे अदा करण्यात आली. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत जीआयएस आधारित ईआरपी प्रणालीसाठी व्हर्च्युअल मशिन उपलब्ध करून देण्यासाठी २ कोटी २० लाख ७ हजार २५२ रुपयांच्या खर्चालाही स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.

मेट्रो प्रकल्पाच्या कामामुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींवर ठोस भूमिका घेताना, शहरातील पायाभूत सुविधा आणि सेवा सुधारण्याच्या विविध प्रस्तावांना स्थायी समितीने एकाच वेळी गती दिल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले.

## वायसीएम रुग्णालयात पुरेसा रक्तसाठा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील रक्तकेंद्रात सध्या विविध रक्तघटकांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शहरातील गरजू रुग्णांना सातत्याने रक्तपुरवठा केला जात आहे. कोणत्याही रुग्णाला 'रक्त उपलब्ध नाही' या कारणास्तव परत जावे लागलेले नाही, अशी माहिती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी दिली.

सद्यस्थितीत रक्तकेंद्रात लाल रक्तपेशींच्या २१५ बॅग्ज, प्लाझ्माच्या २१३ बॅग्ज, प्लेटलेट्सच्या ४ बॅग्ज आणि क्रायो प्रेसिपिटेटच्या १५ बॅग्ज असा एकूण सुमारे ४५० रक्तघटकांचा साठा उपलब्ध आहे. दररोज सरासरी ६० ते ७० रक्तघटकांच्या बॅग्जचे वितरण विविध रुग्णालयांना आणि गरजू रुग्णांना करण्यात येत आहे. वाढत्या मागणीचा विचार करून रक्तकेंद्राकडून साठा व्यवस्थापन नियोजनबद्ध पद्धतीने केले जात आहे. आपत्कालीन परिस्थितीतही रक्ताची कमतरता भासू नये यासाठी विशेष दक्षता घेतली जात आहे. पुढील काही दिवसांत शहरात सहा ते सात रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून त्यातून अंदाजे ६०० रक्तपिशव्यांचे संकलन अपेक्षित आहे. तसेच दररोज ८ ते १० रक्तदाते रक्तदानासाठी पुढे येत आहेत. पालिकेच्या आरोग्य यंत्रणेमार्फत रक्तसंकलन, साठवण आणि वितरणाची प्रक्रिया प्रभावीपणे राबवली जात असून, ही अत्यावश्यक सेवा अखंडित ठेवण्यात आली आहे. सक्षम व्यवस्था उभारण्यावरही भर दिला जात आहे.

## स्थायी समितीत विविध विकासकामांना मंजुरी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समितीच्या बैठकीत शहरातील विविध विकासकामे आणि विभागनिहाय प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात पार पडलेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सभापती अभिषेक बारणे होते.

या बैठकीला स्थायी समिती सदस्यांसह नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर तसेच महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत शहरातील पायाभूत सुविधा, आरोग्य, स्वच्छता आणि स्मार्ट सिटी प्रकल्पांशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रातील केमिकल टाक्यांना सुरक्षा आवरण उभारणे तसेच संबंधित कामांना मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक २ मधील मोशी-बोऱ्हाडेवाडी परिसरात नाले, पावसाळी चेंबर्स साफसफाई आणि स्वच्छतागृह उभारणीसाठी प्रस्ताव मंजूर करण्यात आला. नेहरूनगर, खराळवाडी तसेच पिंपळे गुरव भागात स्थापत्य आणि रोड फर्निचर दुरुस्तीची कामेही हाती घेण्यास मान्यता देण्यात आली. रावेत, किवळे, मामुर्डी, विकासनगर, साईनगर आणि कोतवालनगर या भागांमध्ये रस्ते दुरुस्ती, महापालिका इमारती आणि स्मशानभूमींची देखभाल करण्यास मंजुरी देण्यात आली. रावेत येथील इंद्रप्रभा सोसायटी परिसरात रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे महापारेषण कंपनीचे १३२ केव्ही क्षमतेचे दोन वीज मनोरे हलविण्याचाही निर्णय घेण्यात आला. झोपडपट्टी भागांमध्ये गटार, स्टॉर्म वॉटर लाईन आणि इतर दुरुस्तीची कामे करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच महापालिका शाळा, दवाखाने आणि प्रशासकीय इमारतींच्या देखभाल-दुरुस्ती व फर्निचर कामांना मंजुरी देण्यात आली. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत जीआयएस आधारित ईआरपी प्रणालीसाठी व्हर्च्युअल मशिन उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

याशिवाय, संत तुकाराम महाराज संतपीठासाठी निधी वर्ग करणे, सावित्रीबाई फुले उद्यानातील विद्युत कामे पूर्ण करणे तसेच विविध जयंती कार्यक्रमांसाठी ध्वनी व प्रकाश व्यवस्था करण्याच्या खर्चालाही स्थायी समितीने हिरवा कंदील दिला.

### महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने

# सार्वजनिक सायकल शेअरिंग प्रकल्पाचे उद्घाटन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने, स्टार्ट-अप प्री-वाई मार्फत पिंपळे सौदागर येथील लिनिअर गार्डनमध्ये सार्वजनिक सायकल शेअरिंग प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. नगरसदस्य शत्रुघ्न उर्फ बापू काटे आणि विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या हस्ते हा उपक्रम सुरू करण्यात आला.

या प्रसंगी नगरसदस्या कुंदा भिसे, अनिता काटे यांच्यासह प्रभारी शहर अभियंता मनोज सेठिया, सह शहर अभियंता बापू गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनिल पवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प साकारण्यात आला आहे.

शहरातील नागरिकांना अल्प अंतरासाठी किफायतशीर, सोयीस्कर आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. विशेष म्हणजे, जागतिक स्तरावर ६६ देशांमधील २७५ अर्जांमधून निवड झालेल्या आठ शहरांमध्ये पिंपरी चिंचवडचा समावेश झाल्याने या उपक्रमाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

निखिल देशमुख आणि प्रत्युष श्रीनिवासन यांनी या प्रकल्पाची संकल्पना विकसित केली असून, युरोपियन मानकांनुसार या राइडशेअर प्रणालीची रचना करण्यात आली आहे. आयईसी या आंतरराष्ट्रीय डीसी चार्जिंग प्रोटोकॉलचा अवलंब करण्यात आला असून, आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या अंतर्गत या प्रकल्पाचे मार्गदर्शन व मॉनिटरिंग केले जात आहे. जर्मनीतील तज्ज्ञांकडूनही या स्टार्टअपला तांत्रिक सहाय्य मिळत आहे.

या प्रकल्पात डॉक-टू-डॉक राइडशेअर प्रणाली, जिओ-फेन्सिंगवर आधारित सुरक्षित संचालन, आयओटी तंत्रज्ञानाचा वापर, केंद्रीकृत कमांड आणि कंट्रोल प्रणाली, तसेच स्मार्ट आणि ई-बायसिकल्सची उपलब्धता अशा अत्याधुनिक सुविधा देण्यात आल्या आहेत. डॉक-आधारित चार्जिंग सुविधेमुळे वापर अधिक सुलभ करण्यात आला आहे.

हा उपक्रम केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून, स्वच्छ, शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक शहर उभारण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानला जात आहे. भविष्यातील स्मार्ट मोबिलिटीसाठी नवी दिशा देणारा हा प्रकल्प शहराच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित विकासाला गती देणारा ठरणार आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी कनिष्ठ अभियंता अमोल पांचगणे आणि गिरीश गुठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## डीबीटीला बगल देत क्यूआर कोड पद्धतीचा प्रस्ताव

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या शिक्षण विभागाकडून शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी ऐवजी क्यूआर कोड पद्धती लागू करण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने वाद निर्माण झाला आहे. शासनाने लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले असतानाही ही पद्धत टाळली जात असल्याने ठेकेदारांना लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा पालक आणि सामाजिक संस्थांमध्ये सुरू आहे.

मागील २०२३-२४ शैक्षणिक वर्षात डीबीटीची अंमलबजावणी करण्यात आली होती; मात्र नियोजनातील त्रुटींमुळे काही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहिले. त्या त्रुटी दूर करून योजना अधिक सक्षम करण्याऐवजी पुन्हा ठेकेदारी पद्धतीकडे वळण्याचा आरोप होत आहे. विद्यार्थ्यांना बॅग, रेनकोट, शूज, मोजे, वह्या, पुस्तके, पाण्याच्या बाटल्या आदी साहित्य क्यूआर कोडद्वारे नियुक्त पुरवठादारांकडून घ्यावे लागणार आहे. गतवर्षीच्या साहित्याच्या दर्जाबाबत तक्रारी होऊनही संबंधित ठेकेदारांवर ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. तरीही त्याच पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबवण्याची तयारी सुरू असल्याने पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यंदा सुमारे ५१ हजार विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार असून, डीबीटीऐवजी क्यूआर कोड प्रणालीमुळे पुन्हा अनियमितता होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशी) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### शिरूरमध्ये ड्रग्जसह दोन तरुण ताब्यात

**शिरूर :** पुणे जिल्ह्यातील शिरूर परिसरात दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) मोठी कारवाई करत मॅफेड्रॉन (एमडी) या अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या दोन तरुणांना ताब्यात घेतले. या कारवाईत सुमारे १ लाख ४ हजार रुपयांचा ड्रग्ज साठा जप्त करण्यात आला असून, ७ मार्च रोजी ही कारवाई पार पडली. रांजणगाव एमआयडीसी आणि शिरूर परिसरात एमडीसारख्या घातक अमली पदार्थांचा वाढता वापर आणि तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याची माहिती समोर आल्यानंतर पोलिसांनी याची गंभीर दखल घेतली होती. या कारवाईत साहील संदीप करंजुळे (वय २०, रा. पाडळी, रांजणगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) आणि ओंकार संजय धावडे (वय २३, रा. रामलिंग रोड, शिरूर, जि. पुणे) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून विक्रीसाठी ठेवलेला एमडी ड्रग्ज साठा जप्त करण्यात आला.

### खेडमध्ये सराईत गुन्हेगाराला अटक

**खेड :** पुणे ग्रामीण पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूर्ण आणि धाडसी कारवाई करत ३५ गंभीर गुन्ह्यांचा रेकॉर्ड असलेल्या कुख्यात सराईत गुन्हेगाराला त्याच्या साथीदारासह अटक केली आहे. या कारवाईत केवळ एका खून प्रकरणाचा उलगडा झाला नसून, तब्बल तीन खुनांची मालिका उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. खेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जैदवाडी परिसरातील एका निर्जन जागेत धनंजय मारुती घेवडे (वय ३३) यांचा मृतदेह आढळून आला होता. डोक्यावर आणि चेहऱ्यावर लोखंडी हत्याराने केलेल्या जबर मारहाणीमुळे त्यांचा खून झाल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले होते. मयताच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून खेड पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. अटक करण्यात आलेला आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर खून, मारहाण, दरोडा यांसारखे ३५ गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

## आमदार बाबाजी काळे यांच्या पुढाकाराने ८ गावांसाठी टँकर मंजूर

# खेड तालुक्यात पाणीटंचाईवर दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरूनगर :** खेड तालुक्यात वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत आठ गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर मंजूर केले आहेत. आमदार बाबाजी काळे यांच्या पुढाकारामुळे हा निर्णय शक्य झाला असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या गंभीर बनली होती. स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मागणी होत असल्याने आमदार काळे यांनी परिस्थितीचा आढावा घेऊन प्रशासनाला तातडीने टँकर सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी आदेश जारी करत आठ गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयानुसार




वाकळवाडीसाठी दररोज १० हजार लिटरच्या ३ खेपा, कोहिंडे बुद्रुकसाठी ५ खेपा, तळवडेसाठी २ खेपा देण्यात येणार आहेत. पूर आणि गुळणी गावांसाठी प्रत्येकी १२ हजार लिटरच्या ३ खेपा, तर वाफगाव, कन्हेरसर आणि वरुडे या गावांसाठी प्रत्येकी १२ हजार लिटरच्या ५ खेपा दिल्या जाणार आहेत. प्राथमिक टप्प्यात ३१ टँकर खेपांद्वारे पाणीपुरवठा होणार आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरळीत आणि पारदर्शक पद्धतीने व्हावा, यासाठी संबंधित यंत्रणांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. या उपाययोजनेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना तात्पुरता का होईना, पण दिलासा मिळणार असून, प्रशासनाच्या तत्परतेचे स्वागत होत आहे. "दरवर्षी निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पूर्व भागातील शेतीला पाणी मिळावे तसेच पश्चिम भागात पूल-कम-बंधारा उभारण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा अंतिम टप्प्यात आहे," असे आमदार बाबाजी काळे यांनी सांगितले.

## आंबेगावच्या पूर्व भागात गॅस टंचाई; गृहिणी हैराण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात घरगुती गॅस सिलेंडरची टंचाई तीव्र होत असून नागरिकांसह गृहिणींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. निरगुडसर, अवसरी, पारगाव, शिंगवे, नागापूर, जवळे, भराडी, लोणी, धामणी आणि लाखणगाव परिसरात गॅस वेळेवर उपलब्ध होत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून गॅस पुरवठा अनियमित होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. अनेकांनी ऑनलाईन किंवा एजन्सीकडे बुकिंग करूनही सिलेंडर मिळण्यासाठी दोन ते तीन दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. वितरण गाडीची वेळ निश्चित नसल्याने ग्रामस्थांना दिवसभर वाट पाहावी लागत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय पातळीवरील तणावपूर्ण परिस्थितीमुळे इंधन आणि एलपीजी पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. त्याचा परिणाम देशांतर्गत दरवाढीत दिसून येत असून घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत सुमारे ६० रुपयांची वाढ झाली आहे. सध्या सिलेंडरचा दर ८६० ते ९०० रुपयांच्या दरम्यान पोहोचला आहे. महागाईच्या पार्श्वभूमीवर या दरवाढीचा मोठा फटका ग्रामीण भागातील कुटुंबांना बसत असून गृहिणींचे स्वयंपाकघराचे गणित विस्कळीत झाले आहे. त्यातच गॅस वेळेवर न मिळाल्याने स्वयंपाकाची गैरसोय होत असल्याची तक्रार महिलांनी व्यक्त केली.

संबंधित गॅस एजन्सींनी नियमित व वेळेवर पुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने या भागातील वितरण व्यवस्थेकडे लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मंचर रस्त्यावर धोकादायक विहीर



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील भागडी ते मंचर या महत्त्वाच्या मार्गावर खडकी गावाच्या हद्दीत गणेशनगर परिसरात रस्त्यालगत असलेल्या उघड्या विहिरीमुळे वाहतुकीस गंभीर धोका निर्माण झाला आहे. ही विहीर रस्त्याच्या अगदी कडेला असून तिच्याभोवती कोणतेही संरक्षक कठडे नसल्याने विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांना मोठा धोका पत्करावा लागत आहे.

या ठिकाणी रस्त्याला मोठे वळण असल्याने वाहनांचा वेग नियंत्रित न राहिल्यास अपघात होण्याची शक्यता अधिक असल्याचे वाहनचालकांचे म्हणणे आहे.

अनेकांनी या धोकादायक परिस्थितीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

अलीकडेच नाशिकमध्ये रस्त्यालगतच्या विहिरीत कार कोसळून एकाच कुटुंबातील नऊ जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, अशा प्रकारच्या उघड्या विहिरींमुळे निर्माण होणारा धोका पुन्हा अधोरेखित झाला आहे. त्यामुळे भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी गणेशनगर येथील विहिरीभोवती तात्काळ मजबूत लोखंडी संरक्षक कठडे उभारावेत, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून होत आहे.

# डॉ. आंबेडकर जयंती उत्साही शांततेत साजरी करा

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आळंदी पंचक्रोशीत सर्वांनी सामाजिक सलोखा राखत उत्साही आणि शांततेत जयंती साजरी करावी, असे आवाहन आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांनी केले. आळंदी पोलीस स्टेशनच्या सभागृहात आयोजित शांतता समिती बैठकीत ते बोलत होते.



या बैठकीस नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, शांतता समितीचे पदाधिकारी, विविध गावांतील जयंती उत्सव समितीचे सदस्य, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नरके यांनी विविध मंडळांच्या मिरवणुका, कार्यक्रमांचे नियोजन आणि स्वरूप याची माहिती घेत मार्गदर्शन केले.

जयंतीनिमित्त १४ ते २० एप्रिलदरम्यान मिरवणुका काढण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले. यावर मार्गदर्शन करताना त्यांनी शक्यतो १४ एप्रिललाच मिरवणुका आयोजित करण्याचे आवाहन केले. त्या दिवशी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत परवानगी असून इतर दिवशी रात्री १० वाजेपर्यंतच मिरवणुकींना परवानगी राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सर्व मिरवणुका वेळेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडाव्यात, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची जबाबदारी आयोजकांनी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. जयंतीनिमित्त मिरवणुका, प्रतिमा पूजन, रक्तदान शिबिरे, संविधान जनजागृती अभियान, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांत लोकसहभाग वाढवतानाच ध्वनीप्रदूषण टाळणे, फटाक्यांवर नियंत्रण ठेवणे आणि वाहतुकीची अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले.

नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनीही जयंती सामाजिक प्रबोधन दिन म्हणून साजरी करण्याचे आवाहन केले. डॉ. आंबेडकर यांच्या समता, बंधुता, शिक्षण आणि संघटनाच्या विचारांवर चालत समाज विकासासाठी एकत्र येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. नगरपरिषदेच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीदरम्यान श्रीराम नवमी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम पालखी मिरवणूक आणि जन्मोत्सव सोहळ्यासाठी दिलेल्या पोलीस बंदोबस्ताबद्दल आळंदी पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निसार सय्यद यांनी केले. बैठकीच्या यशस्वीतेसाठी पोलीस नाईक मच्छिंद्र शेंडे व पोलीस कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मंचरमध्ये बिबट मादी जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** शहर परिसरात बिबट्यांचे दर्शन वारंवार होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर मुळेवाडी परिसरात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात एक बिबट मादी जेरबंद करण्यात यश आले असले, तरी परिसरात अजूनही बिबट्यांचा वावर असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



मंचर शहर आणि परिसरात मागील काही दिवसांत बिबट्या दिसल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. ग्रामीण रुग्णालय परिसरासह मोरडेवाडी भागातही बिबट्याचे दर्शन झाल्याची नोंद आहे. शेतीक्षेत्र सोडून बिबट्यांचा वावर आता शहराच्या हद्दीत वाढू लागल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. मुळेवाडीतील लक्ष्मी रत्न सोसायटी परिसरात बिबट्या दिसत असल्याची माहिती स्थानिकांनी वनविभागाला दिल्यानंतर मंचर वनपरिक्षेत्राधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणी पिंजरा लावण्यात आला होता. आज पहाटेच्या सुमारास या पिंजऱ्यात बिबट मादी अडकली. ही माहिती समजताच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली.

वनविभागाचे कर्मचारी आणि बचाव पथकाने घटनास्थळी दाखल होत तातडीने बिबट मादीला सुरक्षितरीत्या ताब्यात घेऊन अवसरी वन उद्यान केंद्रात हलवले. या कारवाईमुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी परिसरात आणखी बिबटे असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरात बिबट्यांचा वाढता वावर लक्षात घेता भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी वनविभागाने अधिक ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## सहा शाळांना सोलर प्लांटचे लोकार्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरे खुर्द येथे ७ एप्रिल २०२६ रोजी 'क्लीन एनर्जी एक्सेस प्रोग्रॅम' अंतर्गत सहा शाळांसाठी सोलर प्लांटचे लोकार्पण करण्यात आले. ऍटीव्ह कंपोनेंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एनर्जी कन्झर्वेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. या सोहळ्याचे उद्घाटन ऍटीव्ह कंपनीचे संकेत जाधव, सागर वाव्हळ तसेच आयआयईसीचे वरिष्ठ अधिकारी अमर यादव, वरिष्ठ प्रोग्राम मॅनेजर अनंत जोशी, अधिकारी मनीष सेहरावत, समन्वयक तुषार बिनवडे आणि अंकुश कोकणे यांच्या हस्ते झाले. ग्रामीण भागातील शाळांना सातत्याने वीजपुरवठा मिळावा, संगणक कक्ष आणि इतर शैक्षणिक सुविधा सुरळीत चालाव्यात, यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

# निरगुडसरची लेक पोलीस दलात अव्वल



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील निलिमा राजेश टाव्हरे हिने जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस दलात निवड मिळवत पालघर पोलीस दलात प्रथम स्थान पटकावले आहे.

तिच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी जल्लोषात तिचे स्वागत केले.

निलिमा अवघी आठ वर्षांची असताना तिच्या वडिलांचे निधन झाले. या कठीण प्रसंगानंतर तिच्या संगोपनाची जबाबदारी चुलते रमेश टाव्हरे आणि चुलती गीता टाव्हरे यांनी स्वीकारली. त्यांनी आई-वडिलांप्रमाणे प्रेम आणि आधार देत निलिमाला शिक्षणासोबतच मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा दिली. याच जिद्दीच्या बळावर निलिमाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यश मिळवले.

तिच्या या यशानिमित्त गावात भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि "आपली लेक, आपला अभिमान" अशा घोषणांनी गाव दुमदुमून गेले. या वेळी महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी निलिमाचा सत्कार करून तिच्या कर्तृत्वाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील मुलींनीही मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करू शकतात, याचे निलिमा हे जिवंत उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले.

लहानपणापासून देशसेवेचे स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून निलिमाने शिस्त, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले. तिच्या यशामुळे गावातील तरुण-तरुणींना नवी दिशा मिळाली असून "स्वप्न मोठं ठेवा आणि त्यासाठी झटत राहा" हा संदेश तिने कृतीतून दिला आहे. निरगुडसर गावासाठी हा क्षण केवळ आनंदाचा नाही, तर प्रेरणेचा ठरला आहे.

## आदिवासी शेतकऱ्यांना नवी बाजारपेठ

# दोन दिवसीय स्ट्रॉबेरी महोत्सवात लाखोंची उलाढाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अवसरी :** दुर्गम भागातील आदिवासी शेतकऱ्यांनी पिकवलेल्या स्ट्रॉबेरीला शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, चिंचवड येथील एल्प्रो सिटी स्क्वेअर मॉलमध्ये झालेल्या दोन दिवसीय स्ट्रॉबेरी महोत्सवात लाखो रुपयांची उलाढाल झाली. ४ आणि ५ एप्रिल रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव आणि 'सिल्क पुणे' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवामुळे



शेतकऱ्यांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची मोठी संधी मिळाली.

दुर्गम भागात उत्पादित झालेली ताजी स्ट्रॉबेरी थेट शहरातील ग्राहकांपर्यंत पोहोचल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळाला. परिणामी, शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या उत्पन्नातही वाढ झाली आहे. महोत्सवात स्ट्रॉबेरीसोबतच त्यापासून तयार करण्यात आलेली बर्फी, लस्सी, जॅम, सिरप, मुखवास आणि गुलकंद यांसारखी प्रक्रिया उत्पादनेही ग्राहकांच्या पसंतीस उतरली. या उपक्रमाची सुरुवात २०२४-२५ या आर्थिक वर्षात करण्यात आली. आंबेगाव तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांनी स्ट्रॉबेरी लागवडीची मागणी केल्यानंतर दिलीप वळसे पाटील यांनी आदिवासी व कृषी विभागाला योजनेबाबत सूचना दिल्या. त्यानुसार 'न्यूक्लिअस बजेट' अंतर्गत विशेष योजना राबविण्यात आली. या योजनेत पारंपरिक शेतीऐवजी नगदी पिकांकडे वळण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. प्रति लाभार्थी ०.५ गुंठा क्षेत्रासाठी ४६,८०० रुपये खर्च निश्चित करण्यात आला होता. यापैकी ३९,७८० रुपये शासन अनुदान तर ७,०२० रुपये शेतकऱ्यांचा सहभाग होता. या योजनेमुळे दुर्गम भागातील १८३ शेतकरी स्ट्रॉबेरी लागवडीकडे वळले. शेतकऱ्यांना उच्च दर्जाची रोपे, मल्चिंग पेपर, ठिबक सिंचन संच तसेच आवश्यक सूक्ष्म अन्नद्रव्ये देण्यात आली. याशिवाय प्रशिक्षण आणि कृषी सहलींद्वारे आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहितीही देण्यात आली.

आंबेगाव तालुक्यातील शेतकरी शंकर केंगले यांनी सांगितले की, "या महोत्सवामुळे आम्हाला शहरातील मोठी बाजारपेठ मिळाली. दोन दिवसांत झालेल्या विक्रीमुळे आमचा आत्मविश्वास वाढला आहे." महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी गिरीश प्रभुणे, नंदिनी आवडे, मंजिरी मनोलकर, दिलीप देशमुख, प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई आदी मान्यवर उपस्थित होते.

## ज्योती गोरडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव) येथील प्रगती डाळ मिलच्या उद्योजिका ज्योती अरुण गोरडे यांना युगप्रवर्तक प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा 'स्वामी विवेकानंद युवा उद्योजक' हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. सामाजिक बांधिलकी जपत उद्योगाच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

ज्योती गोरडे यांनी दिव्यांगांचे पुनर्वसन, तळागाळातील वंचित घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरले आहेत. निराधार व विधवा महिलांना संजय गांधी योजनेचा लाभ मिळवून देणे, दिव्यांगांसाठी शस्त्रक्रिया व सवलतींची सोय, श्रावण बाळ योजनेचा लाभ, डोळ्यांच्या शस्त्रक्रिया तसेच दिव्यांगांना प्रमाणपत्र व पास उपलब्ध करून देणे अशा विविध उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय भूमिका बजावली आहे.

आपल्या उद्योगाच्या माध्यमातून त्यांनी ५०० हून अधिक महिलांना प्रशिक्षण देत स्वावलंबनाचा मार्ग दाखवला आहे. बचत गटांच्या बळकटीसाठीही त्यांनी मोलाचे कार्य केले आहे. कोणतीही अपेक्षा न ठेवता निरपेक्ष भावनेने समाजासाठी काम केल्यामुळेच त्यांना हा सन्मान मिळाल्याचे मानले जात आहे.

## सारांश वृत्त

### चित्रपट कलाकार मतदानासाठी बाहेर

**तिरुवनंतपुरम:** केरळमधील सर्व राजकीय आघाड्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या २०२६ च्या महत्त्वपूर्ण विधानसभा निवडणुकीत, लोकप्रिय चित्रपट कलाकारांनी गुरुवारी मतदान करून मतदारांचा उत्साह दर्शवला. या निवडणुकीत अभिनेते रमेश पिशारोडी, अंजली नायर आणि मेजर रवी यांच्यासह किमान आठ सेलिब्रिटी विविध मतदारसंघांतून निवडणूक लढवताना दिसले आहेत.

### बीआरएस आमदाराची सायबर फसवणूक

**हैदराबाद** : बीआरएस आमदार पल्ला राजेश्वर रेड्डी यांनी गुरुवारी सांगितले की, त्यांच्या मतदारसंघातील केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत बेरोजगार तरुणांना आर्थिक मदत देणारे अधिकारी असल्याचे भासवणाऱ्या सायबर गुन्हेगारांनी त्यांची फसवणूक केली. विधानसभेत जंगावचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रेड्डी यांनी सांगितले की, घोटाळेबाजांनी ५ एप्रिल रोजी त्यांच्याशी संपर्क साधून दावा केला की, 'पंतप्रधान विकसित भारत' योजनेअंतर्गत मतदारसंघातील ४० तरुण-तरुणींना ५ लाख रुपयांच्या अनुदानासह एकूण १० लाख रुपयांची मदत मिळेल. त्याला प्रत्येक अर्जासाठी २५०० रुपये भरण्याचे निर्देश देण्यात आले असून, त्यासाठी ५ एप्रिल ही अंतिम मुदत आहे.




### शालेय बसची ट्रकला धडक

**इटानगर** : पश्चिम बोकारो झारखंडच्या बोकारो जिल्ह्यात गुरुवारी दुपारी विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या बसची ट्रकशी समोरासमोर धडक झाल्याने किमान १२ विद्यार्थी जखमी झाले, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. हा अपघात चंद्रपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राजाबेडा रेल्वे पुलाजवळ घडला. इयत्ता ८ वी ते १२ वीच्या जखमी विद्यार्थ्यांना चंद्रपुरा डीव्हीसी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि त्यापैकी चौघांना नंतर बोकारो जनरल रुग्णालयात पाठवण्यात आले, असे त्यांनी सांगितले.

## पंतप्रधान मोदी यांचे मतदारांना सत्तांतराचे आवाहन

# पश्चिम बंगालमध्ये 'भय'ऐवजी 'भरोसा'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**हल्दिया :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप सत्तेत आल्यास राज्यात "भय" नव्हे तर "भरोसा"चे वातावरण निर्माण करण्याचे आश्वासन दिले. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस सरकारवर भ्रष्टाचार, गैरव्यवस्थापन आणि तरुणांच्या फसवणुकीचे आरोप करत त्यांनी मतदारांना सत्तांतराचे आवाहन केले.

विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांच्या बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या हल्दिया येथील जाहीर सभेत बोलताना मोदी म्हणाले की, "आज बंगालमध्ये भीतीचे वातावरण आहे. भाजप सरकार आल्यास प्रत्येक नागरिकाला सुरक्षितता आणि विश्वास मिळेल, तसेच प्रत्येक सरकारी अधिकारी जनतेसमोर जबाबदार असेल."

भाजप सत्तेत आल्यास सहा महत्त्वाच्या हमी देत त्यांनी सांगितले की, टीएमसी सरकारने दडपून ठेवलेल्या भ्रष्टाचार आणि महिलांवरील अत्याचारांच्या सर्व प्रकरणांची पुन्हा चौकशी केली जाईल आणि दोषींना कठोर शिक्षा दिली जाईल. "कोणताही भ्रष्ट नेता वाचणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला. सर्व पात्र नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळेल आणि "घुसखोरांवर" कारवाई केली जाईल, असेही ते म्हणाले. राज्य कर्मचारी, शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांसाठी सातवा वेतन आयोग लागू करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.


विकासाच्या मुद्द्यावरून टीएमसी सरकारवर हल्ला चढवत मोदी म्हणाले की, "एकीकडे देश वेगाने प्रगती करत आहे, तर दुसरीकडे बंगाल मागे पडत आहे. 'विकसित बंगाल' घडवण्यासाठी सत्तांतर आवश्यक आहे." खासगी क्षेत्र उद्ध्वस्त करून आणि पैशासाठी सरकारी नोकऱ्यांची विक्री करून टीएमसीने तरुणांचे नुकसान केल्याचा आरोप त्यांनी केला.

गुंतवणूक आणि उद्योगांबाबत बोलताना मोदी म्हणाले की, भीतीच्या वातावरणात उद्योग येत नाहीत. "भाजप विश्वासाचे वातावरण निर्माण करेल, ज्यामुळे बंगालमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येईल," असा दावा त्यांनी केला. तसेच, टीएमसी मतपेढी मजबूत करण्यासाठी धर्माधारित आरक्षणाचा वापर करत असल्याचाही आरोप त्यांनी केला.

सभेला प्रतिकूल हवामान असूनही मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहिल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले की, "ही उपस्थितीच बदलाची चाहूल आहे." २०२१ च्या निवडणुकीत नंदिग्राममध्ये ममता बॅनर्जी यांचा झालेला पराभव आठवून देत त्यांनी यावेळीही तसाच निकाल लागेल, असा विश्वास व्यक्त केला. सध्या भवानीपूरमध्ये होणाऱ्या लढतीतही भाजपला यश मिळेल, असे ते म्हणाले.

'डबल इंजिन' सरकारची गरज अधोरेखित करत मोदी म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकार एकत्र काम केल्यासच विकासाला गती मिळते. मत्स्यव्यवसाय आणि सागरी खाद्य क्षेत्रात बंगालला आत्मनिर्भर बनवण्याचे आश्वासन देतानाच, मच्छिमारांच्या कल्याणासाठी केंद्र सरकारने विशेष मंत्रालय स्थापन करून विक्रमी निधी दिल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

## मतदार याद्यांवरून राजकारण तापले



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी भाजपवर गंभीर आरोप करत राज्यातील मतदार यादीतून ९० लाखांहून अधिक लोकांची नावे वगळल्याचा दावा केला. तसेच आगामी निवडणुकांमध्ये तृणमूल काँग्रेसच विजय मिळवेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील मीनाखान येथे आयोजित जाहीर सभेत बोलताना त्यांनी सांगितले की, मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या नागरिकांना पुन्हा समाविष्ट करण्यासाठी सत्ताधारी पक्ष न्यायालयात दाद मागणार आहे. "बंगालमध्ये सत्ता मिळवण्यासाठी तुम्ही ९० लाखांहून अधिक लोकांची नावे वगळली, पण आम्हीच जिंकणार," अशा शब्दांत त्यांनी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेवरून भाजपवर टीका केली.

राज्यात एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सुमारे ९१ लाख मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा आरोप केला आहे. याशिवाय, भाजपशासित राज्यांमध्ये बंगाली भाषिकांवर अन्याय होत असल्याचाही आरोप त्यांनी केला. "भाजपशासित राज्यांत बंगाली भाषा बोलल्याबद्दल लोकांचा छळ केला जातो. बंगालीला परकीय भाषा ठरवून बंगाली भाषिकांना घुसखोर ठरवले जाते," असेही त्या म्हणाल्या.

# 'शबरीमला निर्बंध धार्मिक परंपरेचा भाग'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केरळमधील शबरीमला मंदिर येथे मासिक पाळीच्या वयातील महिलांच्या प्रवेशावरील निर्बंधांचे केंद्र सरकारने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात समर्थन केले. २०१८ मधील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय पुरुष श्रेष्ठ आणि महिला कनिष्ठ या गृहितकावर आधारित असल्याचा युक्तिवाद केंद्राने मांडला.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. धार्मिक स्थळांवरील महिलांवरील निर्बंध आणि विविध धर्मांतील धार्मिक स्वातंत्र्याची व्याप्ती या मुद्द्यांवर न्यायालय विचार करत आहे. केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी खंडपीठासमोर लेखी निवेदन सादर करताना सांगितले की, काही धार्मिक स्थळांवर पुरुषांनाही प्रवेशबंदी असते, अशी उदाहरणे आहेत. या खंडपीठात न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना, एम. एम. सुंदरेश, अहसानुद्दीन अमानुल्ला, अरविंद कुमार, ऑगस्टीन जॉर्ज मसिह, प्रसन्न बी. वराले, आर. महादेवन आणि जॉयमाल्य बागची यांचा समावेश आहे.

"हे देवी भगवतीचे मंदिर असून त्यास विशिष्ट श्रद्धा आणि परंपरा जोडलेल्या आहेत. केरळमधील काही मंदिरांमध्ये पुरुष स्त्रियांचा वेश परिधान करून पूजा करतात. त्यामुळे हा प्रश्न स्त्री-पुरुष भेदाचा नसून धार्मिक श्रद्धांचा आहे," असे मेहता यांनी स्पष्ट केले. यावेळी कोट्टनकुलंगारा श्री देवी मंदिर येथील 'चामयविलक्कू' उत्सवाचे उदाहरण देण्यात आले. या परंपरेनुसार, पुरुष स्त्रियांचा वेश धारण करून देवीची पूजा करतात. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के. एम. नटराज यांनीही न्यायालयात मांडणी करताना "सार्वजनिक नैतिकता" हेच शासनाचे मापदंड असल्याचे सांगितले.

# मणिपूरमध्ये संचारबंदी झुगारून निदर्शने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इम्फाळ :** बिष्णुपूर जिल्ह्यात दोन चिमुकल्यांचा बळी घेणाऱ्या बॉम्बहल्ल्याच्या निषेधार्थ मणिपूरच्या खोऱ्यातील पाच जिल्ह्यांत संतप्त नागरिक रस्त्यावर उतरले. संचारबंदी धुडकावून हजारो आंदोलकांनी निदर्शने करत विविध ठिकाणी टायर जाळून संताप व्यक्त केला.

पश्चिम इम्फाळ जिल्ह्यातील टिडिम लाईन परिसरात 'ऑल मणिपूर युनायटेड क्लब्स ऑर्गनायझेशन'च्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी क्वाकेथेलजवळील कार्यालयापासून मोर्चा काढला. हत्याकांडातील



दोषींना तात्काळ अटक करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. ठार झालेल्या दोन अल्पवयीन मुलांचे पोस्टर हातात घेऊन अनेक बालकांनीही या मोर्चात सहभाग नोंदवला. मात्र, सुरक्षा दलांनी हा मोर्चा क्वाकेथेलजवळ पुढे जाण्यापासून रोखला. यानंतर संघटनेच्या प्रतिनिधींना मुख्यमंत्री वाय. खेमचंद सिंह यांची भेट घडवून आणण्यात आली, जिथे त्यांनी आपली मागणी मांडली. ७ एप्रिल रोजी बिष्णुपूर जिल्ह्यातील ट्रोंगलाओबी येथे संशयित दहशतवाद्यांनी एका घरावर बॉम्ब फेकला होता. या भीषण हल्ल्यात ५ वर्षांच्या मुलाचा आणि त्याच्या ६ महिन्यांच्या बहिणीचा मृत्यू झाला. घटनेनंतर संतप्त झालेल्या सुमारे ५०० आंदोलकांनी ट्रोंगलाओबीजवळील गेलमोल येथील सीआरपीएफ छावणीवर हल्ला चढवला. यावेळी सुरक्षा दलांच्या वाहनांची तोडफोड करून त्यांना आग लावण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी जवानांनी गोळीबार केला, ज्यात ३ आंदोलक ठार, तर ३० जण जखमी झाले. बिष्णुपूरमध्ये तणावपूर्ण शांतता असून सोशल मीडियावर अफवा पसरवणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा राज्य सरकारने दिला आहे. गुरुवारी पश्चिम इम्फाळ जिल्ह्यातील सामुरौ येथेही शेकडो आंदोलकांनी मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानाकडे कूच करण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी त्यांना अडवले. बिष्णुपूरमधील मोइरांग लामखाई आणि निंगथौखोंग येथे टायर जाळून वाहतूक ठप्प करण्यात आली. तसेच इम्फाळ पूर्व, खुरई, थौबल आणि काकचिंग जिल्ह्यांतील काही भागांतही अशाच घटना घडल्या.

# 'घुसखोरांना आळा घालण्यासाठी कडक नियम हवेत'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** घुसखोरांना भारतीय नागरिक असल्याचे भासवण्यापासून रोखण्यासाठी आधार कार्डच्या वितरणावर निर्बंध आणण्याची मागणी करत सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेत भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण ला सहा वर्षांपर्यंतच्या मुलांनाच नवीन आधार कार्ड जारी करण्याचे निर्देश देण्याची आणि किशोरवयीन व प्रौढांसाठी अधिक कठोर पडताळणी नियम लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. वकील अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केलेल्या या याचिकेत, १२-अंकी आधार क्रमांक हा केवळ ओळखीचा पुरावा असून तो नागरिकत्व, पत्ता किंवा जन्मतारखेचा पुरावा नाही, हे स्पष्ट करणारे फलक सर्व सार्वजनिक सेवा केंद्रांवर लावण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंतीही करण्यात आली आहे. अधिवक्ता अश्वनी दुबे यांच्यामार्फत दाखल याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, मूळतः ओळखीचा पुरावा म्हणून तयार करण्यात आलेला आधार आता प्रत्यक्षात "पायाभूत दस्तऐवज" बनला आहे. त्याच्या आधारे शिधावाटप कार्ड, रहिवासी दाखला, मतदार ओळखपत्र, वाहन परवाना यांसारखी महत्त्वाची कागदपत्रे मिळवणे सोपे झाले आहे. याचिकेनुसार, यूआयडीएई कडून आतापर्यंत सुमारे १४४ कोटी आधार कार्ड जारी करण्यात आली असून जवळपास ९९ टक्के लोकसंख्येची नोंदणी झाली आहे. या पार्श्वभूमीवर, पडताळणी प्रक्रिया अधिक काटेकोर करण्याची गरज असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याचिकेत दावा करण्यात आला आहे की, सध्याची पडताळणी प्रक्रिया कमकुवत आणि सहज फेरफार करता येण्याजोगी असल्याने घुसखोर आधार मिळवण्यात यशस्वी होत आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाकडून घटस्फोट

# दहा वर्षांच्या वादाला पूर्णविराम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तब्बल दशकभर चाललेल्या वैवाहिक वादाला 'महाभारतासारखे' स्वरूप आल्याचे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयने एका विभक्त जोडप्याला अखेर घटस्फोट मंजूर केला. न्यायालयाने आपल्या विशेष अधिकारांचा वापर करत पतीला पत्नीला ५ कोटी रुपयांची एकरकमी पोटगी देण्याचे आदेश दिले असून, दाम्पत्याच्या दोन अल्पवयीन मुलांचा ताबा आईकडेच ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.



२०१० मध्ये विवाहबद्ध झालेल्या या दाम्पत्याच्या नात्यात काही वर्षांतच दुरावा निर्माण झाला आणि २०१६ पासून ते वेगळे राहू लागले. त्यानंतर सुरू झालेली कायदेशीर लढाई जवळपास दहा वर्षे चालली. पत्नीने पतीवर तिची आणि मुलांची जबाबदारी न पेलल्याचा आरोप केला होता. ती मुंबईतील लोखंडवाला परिसरातील सासऱ्यांच्या नावावर असलेल्या ३-बीएचके फ्लॅटमध्ये राहत होती, तर पतीला हा फ्लॅट रिकामा करून हवा होता. विशेष म्हणजे, या वादात पतीने पत्नी, तिच्या नातेवाईकांबरोबरच तिच्या वकिलांविरोधातही अनेक गुन्हे दाखल केले होते. न्यायालयात पत्नीच्या वकिलांनी असा दावा केला की, पती स्वतः वकील असून त्याने आपल्या कायदेशीर ज्ञानाचा गैरवापर केला. पत्नी, तिचे कुटुंब आणि वकिलांविरोधात ८० हून अधिक खटले दाखल करून त्याने न्यायप्रक्रिया गुंतागुंतीची केली. कौटुंबिक न्यायालय आणि उच्च न्यायालयाने दिलेल्या पोटगीच्या आदेशांचेही त्याने वारंवार उल्लंघन केल्याचे सांगण्यात आले. पतीने स्वतःची बाजू मांडताना पत्नीने त्याच्यावर घरगुती हिंसाचार आणि फौजदारी गुन्हे दाखल करून त्याला मानसिक छळ दिल्याचा आरोप केला. काही काळ कोठडीत राहावे लागल्याने त्याच्या व्यावसायिक प्रतिमेलाही धक्का बसल्याचे त्याने सांगितले. पत्नी उच्चशिक्षित असून चांगले उत्पन्न मिळवत असतानाही मोठी पोटगी मिळवण्यासाठी ती स्वतःला आर्थिकदृष्ट्या दुर्बल दाखवत असल्याचा दावा त्याने केला. आतापर्यंत ४५ लाख रुपये दिल्याचेही त्याने न्यायालयात नमूद केले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने मात्र पतीच्या भूमिकेवर कठोर शब्दांत ताशेरे ओढले. पतीने अनेक कंपन्यांतील पदांचा राजीनामा देऊन आर्थिक जबाबदाऱ्या टाळण्याचा प्रयत्न केल्याचे न्यायालयाने नमूद केले. पत्नी सध्या कोलकात्यात काम करत असली, तरी मुलाच्या शिक्षणासाठी मुंबईत स्थायिक होण्याचा तिचा विचार असून त्यासाठी आर्थिक आधाराची गरज असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. "हा विवाह आता केवळ नावापुरता उरला असून पूर्णपणे कोलमडला आहे," असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत न्यायालयाने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४२ अंतर्गत असलेल्या विशेष अधिकारांचा वापर करून या प्रकरणात 'पूर्ण न्याय' देण्याचा निर्णय घेतला. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, संबंधित दाम्पत्याचा विवाह अधिकृतपणे रद्द करण्यात आला आहे.

# बंगालमध्ये हुमायूनच्या दाव्यांवरून राजकीय वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये गुरुवारी हुमायून कबीर यांचा एक कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. या व्हिडिओत कबीर भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी संबंध असल्याचा दावा करताना दिसत असून, आगामी विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगताना ऐकू येतात.



तृणमूल काँग्रेसकडून निलंबित झाल्यानंतर काही दिवसांतच 'आम जनता उन्नयन पार्टी' स्थापन करणाऱ्या कबीर यांनी, पंतप्रधान कार्यालयाशी संवाद झाल्याचा आणि भाजपशासित राज्यांतील नेत्यांशी समन्वय साधण्याचा सल्ला मिळाल्याचा दावा केल्याचे या व्हिडिओत म्हटले आहे. मात्र, या व्हिडिओची स्वतंत्र पडताळणी झालेली नाही. व्हिडिओमध्ये कबीर एका अज्ञात व्यक्तीशी संवाद साधताना दिसतात. त्यात ते तृणमूल काँग्रेसपासून अल्पसंख्याक मते दूर वळवण्याची रणनीती मांडताना आणि मुस्लिम समाजाचा पाठिंबा असल्याचा दावा करताना ऐकू येतात. तसेच, विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्याशी संपर्क असल्याचाही आरोप कबीर यांनी केला आहे. या सर्वांच्या माध्यमातून निवडणुकीत बॅनर्जी यांचा पराभव करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची योजना राबवली जात असल्याचा दावा त्यांनी केल्याचे व्हिडिओत दिसते.

या प्रकरणावर तृणमूल काँग्रेसने तीव्र प्रतिक्रिया देत अंमलबजावणी संचालनालयामार्फत चौकशीची मागणी केली आहे. पत्रकार परिषदेत पक्षाने हा व्हिडिओ सादर करत कबीर यांच्या दाव्यांची चौकशी करण्याची गरज व्यक्त केली.

## पंजाबमध्ये पालकांना एसएमएस येणार

**चंदीगड :** पंजाब सरकारने शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी मोठा निर्णय घेत 'मिशन सम्राट ४.०' अंतर्गत राज्यभर उपस्थिती-नोंदणी प्रणाली सुरू केली आहे. या नव्या उपक्रमामुळे आता पालकांना त्यांच्या मुलांच्या शाळेतील उपस्थिती आणि गैरहजेरीबाबत दररोज एसएमएस अलर्ट मिळणार आहेत. शिक्षणमंत्री हरजोत सिंग बैन्स यांनी स्पष्ट केले की, या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर काटेकोर लक्ष ठेवता येईल.

## मतदार याद्यांवरून भाकपचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** कोलकाता पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांतून मोठ्या प्रमाणावर नावे वगळल्याच्या मुद्द्यावर भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) ने तीव्र चिंता व्यक्त करत निवडणूक आयोगाला तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. पक्षाचे सरचिटणीस एम. ए. बेबी यांनी गुरुवारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पत्र पाठवून या प्रक्रियेवर "व्यथा, तीव्र चिंता आणि निषेध" नोंदवला.

पत्रात नमूद केल्याप्रमाणे, राज्यातील एकूण मतदारसंख्येच्या सुमारे १२ टक्के, म्हणजेच ९० लाखांहून अधिक मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. वगळण्यात आलेल्यांपैकी अनेकांना 'न्यायनिर्णयाधीन' या श्रेणीत टाकण्यात आले असून, तक्रार निवारण यंत्रणा "अगम्य आणि अकार्यक्षम" असल्याचा आरोपही करण्यात आला. सीपीआय(एम)ने विशेष सघन पुनरावलोकन प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत ती केवळ नियमित अद्ययावतीकरण नसून "मोठ्या प्रमाणावर मताधिकार हिरावून घेण्याची पद्धतशीर मोहीम" असल्याचा आरोप केला. "मतदारांना संशयित म्हणून वागणूक देण्यात आली आणि ते चुकीचे असल्याचे सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांच्यावरच टाकण्यात आली," असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. अनेकांना आर्थिक नुकसान, गैरसोय, मानसिक ताण आणि काही प्रकरणांत मृत्यूदेखील झाल्याचा दावा पक्षाने केला.

## तिरुनेलवेलीतील प्रचारसभेत आरोपांची सरबत्ती

# अभिनेता विजय याचा स्टॅलिन सरकारवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तिरुनेलवेली :** तामिळनाडूतील राजकारण तापवणाऱ्या घडामोडीत, टीव्हीकेचे अध्यक्ष सी. विजय जोसेफ यांनी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील डीएमके सरकारवर तीव्र टीका केली. राज्यात अमली पदार्थांचे वाढते प्रमाण आणि महिलांवरील गुन्हे रोखण्यात अपयश आल्याचा आरोप करत, "गेल्या पाच वर्षांत पोलीस दलाचा योग्य वापर झाला का, की तो केवळ खेळण्यासारखा वापरण्यात आला?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

केटीसी नगरमधील प्रचारसभेत बोलताना विजय यांनी विलाथिकुलम येथील एका मुलीवरील लैंगिक अत्याचार व हत्या, तसेच कृष्णगिरीतील अडीच वर्षांच्या बालिकेवरील अत्याचाराचा उल्लेख करत सरकारवर निशाणा साधला. "नांगुनेरीतील घटना अमली पदार्थांच्या प्रभावाखाली घडल्याचे सरकार सांगते, पण अशा घटना रोखण्यासाठी नेमकी कोणती ठोस कारवाई झाली?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. विजय यांनी डीएमकेवर तामिळनाडू काँग्रेस युनिट "विकत घेतल्याचा" आरोप करत, "खरी काँग्रेस आमच्यासोबत आहे," असा दावा केला. तसेच, टीव्हीकेच्या वाढत्या प्रभावाला रोखण्यासाठी विरोधकांकडून कट रचला जात असल्याचेही त्यांनी म्हटले.

करूरमधील मृत्यूंसाठी टीव्हीकेला जबाबदार धरणे, 'जननायकन' चित्रपटाच्या प्रदर्शनात अडथळे आणणे, पक्षाविरोधात निवडक एसओपी जारी करणे आणि निवडणुकीआधी त्यांच्या समर्थकांना भडकवणे—अशा विविध मुद्द्यांचा उल्लेख करत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर आरोपांची सरबत्ती केली. राज्यातील राजकीय आघाड्यांवरही विजय यांनी टीका केली. "डीएमके आघाडीत अंतर्गत मतभेद आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्येच मतभेद असून ते एकमेकांनाच मतदान करणार नाहीत. भाजप आघाडीची स्थिती याहूनही वाईट आहे," असा दावा त्यांनी केला. विजय यांच्या तिरुनेलवेली दौऱ्यात काही अपघातांच्या घटना घडल्या. थलैयूथू, थचनल्लूर, वन्नारपेट्टाई आणि मुरुगनकुरिची येथे आयोजित रोड शोदरम्यान वन्नारपेट्टाई येथे टीएनएसटीसी बसची धडक बसल्याने एका पेट्रोल पंप कर्मचाऱ्याला गंभीर दुखापत झाली. तसेच, नारानम्मलपुरम येथे दुचाकी घसरल्याने टीव्हीकेचे पाच कार्यकर्ते किरकोळ जखमी झाले. तिरुनेलवेलीच्या दिशेने जात असताना विजय यांच्या ताफ्याभोवती मोठी गर्दी झाली. शेकडो कार्यकर्ते आणि चाहते बाईक्सवरून ताफ्याचा पाठलाग करत होते. वागाईकुलम येथे एका बाईकस्वाराला एस्कॉर्ट कर्मचाऱ्याने ढकलल्याने अनेक दुचाकी घसरल्या. या सर्व घडामोडींमुळे तिरुनेलवेलीतील विजय यांचा दौरा आणि त्यांच्या सरकारविरोधातील आक्रमक भूमिकेमुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.